महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

# सहायक संचालक, (सायबर गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण), न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक : ११९४(C)(१११)/३०२९/आठ** **जाहिरात क्रमांक : १८/२०१८**

**आयोगामार्फत** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागातील **सहायक संचालक, (सायबर गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण), न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट-अ** या संवर्गातील एकूण **सहा** पदाच्या भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतेची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- ६**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | ३ | ३ | ६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | ३ | २ | ५ |
| अ) महिला (३०%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १* | १* |
| ब) खेळाडू (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| क) अपंग (३%) | -- | | | | | | | | | | |
| *- उपलब्ध असल्यास महिलांसाठी राखीव | | | | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** शासनाच्या गृह विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक एफएसएल-०४१७/प्र.क्र.११९/पोल-४, दि. ०७ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु [Locomoter disability or cerebral palsy] (OL) विकलांग असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत. तथापि, विकलांग वर्गवारीसाठी पद आरक्षित नाही.

**२.३** शासन आदेशानुसार वि.जा (अ) या वर्गवारीसाठी आरक्षित असलेले पद आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासनाच्या अंतर्गत परिवर्तनीयतेच्या धोरणानुसार सदर पदासाठी भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) या पैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा गुणवत्तेच्या आधारावर विचार करण्यात येईल.

**२.४** महिला आरक्षण व त्या संदर्भातील नॉन क्रिमीलेयर (NCL) तसेच मागासवर्गीय आरक्षण व त्या संदर्भातील नॉन क्रिमीलेयर (NCL) प्रमाणपत्राचा नमूना आणि इतर अटी व शर्तीबाबत उमेदवारांनी आयोगाच्या संकेतस्थळावरील "सरळसेवा भरती" विभागातील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांचे" काळजीपूर्वक अवलोकन करुनच त्याचे अनुपालन करावे.

**३. वेतनश्रेणी** – रु. १५६०० – रु.३९१०० + ग्रेड पे रु. ६६००/-

**४. पात्रता विषयक अटी**

**४.१** भारतीय नागरिक.

**४.२ वय**:- (१) **दिनांक १ जुलै, २०१८** रोजी अमागास उमेदवाराकरिता ४० वर्षे व मागास प्रवर्गातील ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

(२) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील. तथापि, शासनसेवेतील मागासवर्गीय कर्मचा-यांना त्यांच्या मागासवर्गीय उमेदवारांचे वयोमर्यादेतील सवलतीऐवजी, शासन कर्मचारी म्हणुन ५ वर्षाची एकच सवलत उपलब्ध राहिल.

(३) शासन आदेशानुसार माजी सैनिक व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

(४) अनुसूचित जाती, बौध्द धर्मांतरीत जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती किंवा भटक्या जमातीच्या वर्गवारीतील उमेदवारांपैकी जाहिरातीत विहित केलेल्या अनुभवाचे उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास, अनुभव कालावधी शिथिल करण्याबाबत आयोगाकडून विचार करता येवू शकेल.

**४.३ शैक्षणिक अर्हता :-** The candidate must -

possess a degree and post graduate degree in science faculty with Physics **or** Computer Science **or** Electronics **or** Information & Technology as a main subject at least in second class **or** possess degree in Engineering with Computer Science **or** Electronics **or** Information and Technology at least in second class **or** any other qualification declared by the Government to be equivalent qualification thereto.

**४.४ अनुभव :-** possess analytical or research experience in the relevant subject for a period of not less than **SEVEN** years in any recognized laboratory or Clinical Institute after acquiring the qualification mentioned in the above para 4.3

**टिप- मुलाखतीच्यावेळी उमेदवाराने सादर करावयाच्या अनुभव प्रमाणपत्रामध्ये ४.४ मधील कर्तव्ये व जबाबदा-यांचे स्वरुप असलेला अनुभव नमूद केलेला असणे आवश्यक आहे.**

**४.५ परिवीक्षा कालावधी २ वर्षे राहिल.**

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. अर्हता किमान असून, केवळ किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने, जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष याच्या आधारे निकष निश्चित करुन, अथवा चाळणी परीक्षेव्दारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६.** जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

**७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८. शुल्क :**

**८.१** अमागास - **रु.५२४/-** **८.२** मागासवर्गीय - **रु. ३२४/-**

**"ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादा किंवा पात्रतेच्या इतर कोणत्याही निकषामध्ये सवलत किंवा सूट याचा फायदा घेतला आहे, अशा उमेदवारांची अमागास सर्वसाधारण वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही."**

**९. अर्ज करण्याची पध्दत -**

**९.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**९.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ६ मार्च, २०१८ ते दिनांक २६ मार्च, २०१८** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**९.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**९.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**९.५** आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

**९.६** https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**९.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा.

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर 'Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील.

(१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईल पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहिल.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१०.** चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१३. मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना, मुलाखतीचे वेळी सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल याची कृपया नोंद घ्यावी.**

**१४.** महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्य नियमावली २०१४ तील नियम ९ (viii) नुसार चाळणी परीक्षा घेतल्यास चाळणी परीक्षेचे व मुलाखतीचे गुण मिळून उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

१५. आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परीसरात तसेच मुलाखतीच्यावेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रोनिक साधने आणण्यास / वापरण्यास सक्त मनाई आहे.

१६. **विहित पद्धतीने अर्ज सादर करून ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१७. **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २७ मार्च, २०१८ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**राजन बा. खोत**

ठिकाण : मुंबई

उपसचिव

दिनांक : ६ मार्च, २०१८

महाराष्ट्र लोकसेवा आयोग